रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज, रामानंदनगर (बुर्ली)

ता. पलूस, जि. सांगली

दिनांक १४ एप्रिल २०२०

## सांस्कृतिक विभाग

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती

रामानंदनगर येथील आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स महाविद्यालयामध्ये मंगळवार, दि. 14 एप्रिल 2020 रोजी डॉ. बाबासाहेब आंबडेकरांच्या 129व्या जयंतीचे औचित्य साधून प्रतिमापूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम यांच्यासह सेवकवृंद उपस्थित होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार होते. तसेच स्वतंत्र भारताचे पहिले कायदेमंत्री होते. न्यायशास्त्रज्ञ, अर्थशास्त्रज्ञ, राजनीतिज्ञ, तत्त्वज्ञ, समाजसुधारक म्हणूनही त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे. दलित बौद्ध चळवळीला प्रेरणा देऊन अस्पृश्य लोकांविरुद्ध होणारा सामाजिक भेदभाव नष्ट करण्यासाठी त्यांनी चळवळ उभारली. तसेच महिलांच्या व कामगारांच्या हक्कांचे समर्थन केले होते.

**निष्पत्ती**

- डॉ. बाबासाहेबांच्या जीवनकार्याप्रती सद्भावना प्रकट झाली.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवनकार्याचा जागर झाला.

**लाभार्थी संख्या : ३**




डॉ.बाबासाहेब यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करताना महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी.कदम साहेब

प्रा. प्रतिभा पुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)